# प्रेसनोट दि. ११/०६/२०१९

## जनता वसाहतीत गँगवार मधुन झालेल्या मर्डर मधील आरोपी युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहर यांचेकडून जेरबंद

-----०००-----

दि. १३/०१/२०१९ रोजी जनता वसाहत दत्तवाडी, पुणे येथे दोन गँगमध्ये झालेल्या मारामारीत रेकॉर्डवरील गुन्हेगार निलेश वाडकर याचा सुनिल ऊर्फ चॉकलेट डोईफोडे व त्याचे साथिदार यांनी निर्घुण खुन केला होता. त्याबाबत दत्तवाडी पोलीस ठाणे गुन्हा रजि. ७५/२०१९ भा.द.वि कलम ३०२, ३०७, ३२४, १४३,१४७, १४९, १२० ब, आर्म ॲक्ट कलम ३(२५) ४(२५), क्रि.अॅ.अॅ.क ७ महा.पो.का.क ३७(१)(३)१३५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयाची माहिती घेवून यातील पाहिजे असलेल्या आरोपींबाबत शोध घेत असताना युनिट -१ पथकातील पोलीस कर्मचारी **सचिन जाधव** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, दाखल गुन्हयात आरोपी नामे अविनाश देवकुळे रा जनता वसाहत हा ससुन हॉस्पिटल गेटजवळ चहाचे हातगाडीवर उभा आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाली. सदरबाबत वरिष्ठांना कळवून युनिट-१ कडील अधिकारी व कर्मचारी यांनी सापळा रचुन त्यास ससुन हॉस्पीटल गेटजवळ पुणे येथे ताब्यात घेतले. त्यास त्याचा नाव पत्ता विचारता, त्याने त्याचे नाव व पत्ता अविनाश सुनिल देवकुळे, वय २४ वर्ष, व्यवसाय- मजुरी, रा जय भवानी नगर, गल्ली नं -८, पर्वती पायथा, पुणे असे असल्याचे सांगितले. त्यास दत्तवाडी पोलीस ठाण्याकडील वरील दाखल गुन्हयाचे बाबत विचारपुस करता दाखल गुन्ह्यात त्याचा सहभाग असल्याचे कबुल केले आहे. त्यास ताब्यात घेऊन दाखल गुन्ह्याच्या पुढील कायदेशिर कारवाई कामी दत्तवाडी पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, श्री.अशोक मोराळे, मा. पोलीस उप आयुक्त, श्री शिरीष सरदेशपांडे, मा. सपोआ गुन्हे-१, श्री समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे युनिट-१ विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री अरुण वायकर, पोलीस उपनिरीक्षक हनुमंत शिंदे, दिनेश पाटील, पोलीस कर्मचारी सचिन जाधव, बाबा चव्हाण, सुधाकर माने, तुषार माळवदकर, सुभाष पिंगळे, विजेसिंग वसावे यांनी केली आहे.